**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे**
**'बी' बॅरक मध्यवर्ती इमारत परिसर, कॅम्प पुणे.१**

e-mail-eastpune.ee@mahapwd.com | दुरध्वनी क्र.- (०२०)-२६१२२४५७

जा.क्र. लेखा/निविदा/ २६६१ /सन २०२२ | दिनांक :- २८/०३/२०२३

**कार्यारंभ आदेश WORK ID No. [303354]**

**GST No.27AGVPK7994G1ZF** | **PAN No. AGVPK7994G** | **Rs.500.00 Lakh**

प्रति,

**श्री.अशोक राजाराम कुंभार**
**घर नं.१९३, मु.तक्रारवाडी पो.साकुर्डे**
**ता.पुरंदर जि.पुणे ४१२३०३.**

**Fund Head-** "८४४३ ठेव अंशदान"

**विषय—** **बारामती नगरपरिषद हद्दीतील न्यायमंदिर ते पेन्सिल चौकापर्यंत जाणारा मुख्य रस्ता व सेवा रस्त्यामधील (दोन्ही बाजू) मोकळी बाजू विकसित करणे.**
**Development of Open Side between Main road and Service road (both side) from Nyayamandir to Pencil Chowk in Baramati Municipal Council Limits.**

संदर्भ -
१) शासन परिपत्रक क्र. डीपीटब्ल्यु/१९९६/२६ (ब)/लेखापरिक्षा दिनांक २०/९/१९९७ व महाराष्ट्र शासन सा. बां. विभाग, शा. नि. क्र. विअसु-२०१५/प्र.क्र. २१८/इमारती २, मंत्रालय, मुंबई दिनांक १६/१२/२०१५ आणि शा. नि. क्र. सीएटी /२०१७/प्र. क्र.८/इमा-२, दि. २७/९/२०१८.
२) विभागीय कार्यालयाची ई-निविदा सूचना क्र. ५८ सन २०२२-२०२३. **(ई-निविदा क्र.२०२२_PWDRP_८६१५३९_१)**
३) मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे यांचे पत्र क्र. का-१/जी-११७/निविदा /(३४७५)/१६४४/सन२०२३, दि.०९/०३/२०२३.
४) मा.अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. सावांमं/ जी-११७/निविदा/१८२६/२०२२, दि.१०.०३.२०२३

महाशय,

विषयांकित कामाकरिता आपण निविदेतील सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने तसेच प्राथमिक अनामत रक्कम रू.३,८६,०००/- (रूपये **तीन लाख सह्यांशी हजार** फक्त) रकमेची **अॅक्सीस बॅंक शाखा सासवड पुणे** यांची **मुदत ठेव पावती क्र.U१९०९४४६९३२६ A/C No.९२३०४००६०१६६३८४ दि.२०.०२.२०२३ वैधता दि.१६.०३.२०२४ पर्यंत** या स्वरूपात तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार Performance Security Deposit रक्कम रू.----- (रूपये ---- फक्त) रकमेची ------ यांची **मुदत ठेव पावती क्र---- A/C No.----- दि.----- वैधता दि.---- पर्यंत** जमा केलेली असलेने संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयानुसार प्रदान केलेल्या अधिकारान्वये अधिक्षक अभियंता स्तरावर संदर्भिय मंडळ कार्यालयीन पत्र क्र. ३ अन्वये स्विकृत करणेत येऊन खालील अटी/बाबींच्या अधीन राहुन काम सुरू करणेकरिता निविदा क्र. **ब-१/मु.अ./** १०० **/ सन २०२२-२०२३** नुसार कार्यारंभ आदेश देण्यात येत असून सोबत निविदा प्रमाणित प्रत जोडण्यात येत आहे.

१. कामाची अंदाजपत्रकीय किमत रूपये **३,८५,०१,६८९/-**(अक्षरी रूपये **तीन कोटी पंच्याऐंशी लाख एक हजार सहाशे एकोणनव्वद फक्त)** इतकी असून सदरची निविदा **सन २०२२-२०२३ चे दरसुचीवर** आधारित आहे. आपली निवीदा **अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ०.०५% कमी दराने** म्हणजे रक्कम रूपये **३,८४,८२,४३८/-** (अक्षरी रूपये **तीन कोटी चौरेऐंशी लाख ब्याऐंशी हजार चारशे अडोतीस फक्त)** इतक्या रकमेची तसेच प्रचलित दरसूची २०२१-२०२२ व स्टारेरेटचे फरकासह तुलना करता **अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ०.०५% कमी दराची** असून सदरची निविदा स्विकृत करण्यात येत आहे.

२. कामाची मुदत ही कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून **१८ (अठरा)** महिने एवढी राहील. ही मुदत पावसाळा हंगाम धरून असून कामाची प्रगती निविदातील शर्त २ प्रमाणे सातत्याने ठेवावयाची आहे.

३. सदरहु कामाच्या ठिकाणी देखभालीसाठी आपण नेमलेल्या प्रतिनिधीचे नावे,पत्ते, व भ्रमणध्वनी क्रमांक या कार्यालयास तसेच उप अभियंता, **सा.बां.उपविभाग, बारामती** यांना ७ दिवसांचे आत कळविण्यात यावेत. आपल्या प्रतिनिधीस उप अभियंता/शाखा अभियंता यांनी कामासंबंधात दिलेल्या सुचना/आदेश आपणांवर बंधनकारक राहतील.

४. तसेच कामाचे ठिकाणी कामाचे माहिती दर्शकफलक लावावेत. तसेच काम सुरू करणेपुर्वी व काम पुर्ण झालेनंतर कामाचे फोटो व व्हिडीओ सुटींग साफ्टकॉपीसह देयकासोबत सादर करणेत यावेत.

Scanned with CamScanner

५. कार्यारंभ आदेश मिळलेनंतर आपण करावयाच्या कामाचा प्रत्येक महिन्याचा आराखडा तयार करून ७ दिवसांचे आत या कार्यालयास व **उप अभियंता, सा.बां.उपविभाग, बारामती** यांना कळविणेत यावा. तसेच काम गुणवत्ता राखून ठरवुन दिलेल्या कालावधीमध्ये पुर्ण करणेची जबाबदारी आपली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

६. शासनाने विहीत केल्याप्रमाणे वस्तु व सेवाकर TDS ची वसुली आपले देयकांमधुन नियमानुसार वसुल करण्यात येईल. तसेच शासनाचे नियमानुसार आपणास कामाचे किंमतीच्या १२ % वस्तु व सेवाकर देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. आपण वस्तु व सेवाकर भरणा करून त्याबाबतचे कागदपत्रे विभागीय कार्यालयामध्ये सादर करावी. अन्यथा शासनाचे नियमानुसार आपणाविरूध्द कार्यवाही करणेत येईल.

७. कामासाठी गौण खनिजावरील स्वामित्वधन शासनास भरणे आवश्यक आहे. त्यासाठी योग्य त्या प्राधिकरणांकडे स्वामित्वधन भरणेत येऊन त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा देयकातून वसुली करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

८. महाराष्ट्र शासन सा. बां. विभाग, शासन निर्णय क्र. निविदा-२०१६/प्र.क्र. २०/शिकाना/इमारती-२, दिनांक ९/१२/२०१६ अन्वये **Contractor shall submit a certificate to the effect that "All the payments to thelabour/staff are made in bank accounts of staff linked to Unique IdentificationNumber (AADHAR CARD)." The certificate shall be submitted by the contractorwithin 60 days from the commencement of contract. If the time period of contract isless than60 days then such certificates shall be submitted within 15 days from thedate of commencement of contract**याबतचीपुर्तता करावी. अन्यथा चालु देयके अदा करणेत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

९. काम पुर्ण झालेनंतर सुध्दा कामाचा देखभाल दुरूस्तीबाबत करणेबाबतचा कालावधी **६०** महिने इतका राहील, याची नोंद घ्यावी.

१०. निविदा शर्त क्रमांक **५६** नुसार कामाचा विमा व कामगारांचा विमा काढणे आवश्यक आहे. सदरचा विमा संचालक, विमा निधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडुनच काढण्यात यावा व त्याची प्रत या कार्यालयास त्वरीत सादर करण्यात यावी अन्यथा त्याची वसुली आपल्या देयकातून करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

११. निविदा शर्त क्रमांक **५७** नुसार उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र दिनांक १७/८/२०१० अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ मधील तरतुदीनुसार १ %उपकराची वसुली करण्यात येईल.

१२. शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या सर्व प्रचलित करांची रक्कम भरणे आपणावर बंधनकारक राहील तसेच भविष्यामध्ये केंद्र/महाराष्ट्र शासनाने कोणत्याही कर लागु केल्यास तोसुध्दा भरणे आपणास बंधनकारक राहील. अन्यथा त्याची वसुली आपले देयकातून करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

१२. आपण कामावर नेमलेल्या कामगारांना किमान वेतन दिलेबाबत कामगार आयुक्त यांचा दाखला अंतिम देयकासोबत सादर करावा लागेल.

१३. **सदर कामासाठी आवश्यक असणारी स्टँप ड्युटी ठेकेदार यांचेकडुन रक्कम रु.३८,०५०/- इतकी चलन क्र.१९५४७३३२५१८९७५ दि.२८.०३.२०२३ चलनाद्वारे जमा करणेत आले आहे.**

१४. **उर्वरित अनामत रक्कम** ही आपल्या चालु देयकातून ०.५०%दराने वसूल केली जाईल. त्याचप्रमाणे शासन नियमानुसार आयकर व विक्रीकर वसूल केला जाईल.

१५. सदरहू कामाच्या **लेखाशिर्षातंर्गत उपलब्ध निधीचा विचार करून नंतरच देयके प्रदान करण्यात येतील**. याची कृपया नोंद घ्यावी.

तरी आपण संबंधित **उप अभियंता, सा.बां.उपविभाग, बारामती** यांचेशी संपर्क साधून त्यांचे सुचनेनुसार लवकरात लवकर काम सुरू करून पुर्ण करावे. तसेच यापुढे पत्रव्यवहार करताना सदरचा क्रमांक नमूद करावा. कार्यारंभ आदेश पत्राची पोहोच देण्यात यावी.

**आपला**

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे १.**

प्रत : मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : मा. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत: **उप अभियंता, सा.बां.उपविभाग, बारामती** यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

२/- विषयांकित कामाचा प्रगती अहवाल प्रत्येक १५ दिवसांनी सादर करावा,तसेच अनुदान उपलब्धअसल्यास विषयांकित काम सुरू करावे.

३/- प्रशासकीय/सर्वसाधारण मान्यतेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेऊनमंजूर अनुदानाचे मर्यादेत खर्च समित करणे बाबत सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. तसेच कामाचे ठिकाणी कामाचे माहितीदर्शक फलक लावावेत. व त्यानंतर प्रत्यक्ष लेआऊट देण्यात यावेत. तसेच काम सुरू करणेपूर्वी व काम पुर्ण झालेनंतर कामाचे फोटो देयकासोबत सादर करणेत यावेत.

~~४/- **प्रस्तुत कामाची निविदा ही १० % पेक्षा जास्त कमी दराने असल्याने सा. बां. नियमावली परि. १५० नुसार व शासन परिपत्रक संकीर्ण २००४/प्र.क्र. ८४/इमो-१, दि. २३/६/२००४ अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे या कामाचे कमी दराचे अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिका-यांची मंजूरी घेण्यात यावी.**~~

प्रत: प्रकल्प अधिकारी,**सा.बां.उपविभाग, बारामती** यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत: लेखा/तपासणीस,**सा.बां.उपविभाग, बारामती** यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

२/- प्रशासकीय/सर्वसाधारण मान्यतेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेऊन मंजूर अनुदानाचे मर्यादेत खर्च सिमित करावा.

Scanned with CamScanner